# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet :http//www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/२०१९/९२०
दिनांक : - 1 FEB 2019

प्रति
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.

विषय :- विना अनुदान तत्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे, सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेशक्षमतेत बदल करण्यासाठीच्या प्रस्तावांकरीता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदतठेव ठेवण्याबाबत...

संदर्भ :- १.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. तंशिस/ प्राकाना/ शैवि-१/ Murging/ 2019/ 465 दि. २९ जानेवारी, २०१९.
२.सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र. तंशि/ विकाना/ तांशा/ २०१९/ २८५ दि. ३० जानेवारी, २०१९.
३.शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४, दि. २२ फेब्रुवारी, २०१८.

विषयांकित शासन निर्णयान्वयें अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे मान्यता प्रक्रियेच्या अनुषंगाने विनाअनुदानित संस्थांनी सादर केलेल्या विविध प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भीन शासन निर्णयान्वयें नोंदणी शुल्क निर्धारीत केले आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या मान्यताप्रक्रियेमध्ये खालील प्रस्ताव नव्याने समाविष्ठ केले असून यासाठीचे नोंदणी शुल्क संदर्भीन शासन निर्णयात नमूद नाही. करीता संचालनालयाने पत्र क्र. २/एनजीसी/२०१९/६४ दि. २२ जानेवारी, २०१९ अन्वयें उपरोक्त प्रस्तावांसाठी खालीलप्रमाणे नोंदणी शुल्क घेण्याबाबत शासन मान्यता मिळण्याकरीता शासनास प्रस्तावित केले आहे. सदर मान्यतेच्या अधीन राहून आपणांस या पत्रान्वयें सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नोंदणी शुल्क आकारण्यात यावे.

| अ.क्र. | प्रस्तावांचे नाव | प्रस्तावित शुल्क |
|---|---|---|
| ०१ | एकाच जागी एकाच ट्रस्ट/सोसायटी अंतर्गत विविध संस्थांचे विलीनीकरण | दि. २२ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयातील अ.क्र.१२ प्रमाणे (सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या नावात बदल करणे ) |
| ०२ | संस्थेतील एमबीए अभ्यासक्रम बंद करुन एमसीए अभ्यासक्रम सुरु करणे किंवा याउलट | दि. २२ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयातील अ.क्र. २० (पीजीडीएम अभ्यासक्रमांच्या संस्थांचे रुपांतरण एमबीए अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये करणे ) |

| | | |
|---|---|---|
| ०३ | संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाचे विलीनीकरण / लॅटरल एन्ट्रीच्या स्वतंत्र तुकडीचे प्रथम वर्ष अभियांत्रिकी मध्ये विलीनीकरण / एमसीए चे प्रथम वर्ष नियमित अभ्यासक्रमात विलीनीकरण | रुपांतरण दि. २२ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयातील अ.क्र. २१ (संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमांचे रुपांतरण प्रथम पाळीत करणे ) |

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.